VOL- VII ISSUE- IX SEPTEMBER 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x

# उत्कट भावनांचा अविष्कर: 'लावणी'

**डॉ. मानसी दशरथ जगदाळे**
मराठी विभागप्रमुख
आदर्श कॉलेज, विटा.

मराठी वाड्मयामध्ये प्रामुख्याने संत, पंत, तंत असे स्थूलमानाने तीन प्रकार केले जातात. संत वाड्मयाने अध्यात्मिक क्षेत्रात फार मोठे कार्य केले आहे. त्यांनी सर्वसामान्य लोकांसाठी आपले वाड्मय देशी भाषेतून निर्माण केले. त्यामध्ये अध्यात्म, तत्त्वज्ञान, वेदांत, भक्ती हेच विषय दिसून येतात. तर काही संतांनी स्वता:ला आलेले अनुभव अभंगातून व्यक्त केले. या अभंगातून साक्षात्कार, परमार्थ निरूपण केलेले दिसते. संतांचे काव्य हे परमेश्वर, भक्ती, उपासना, तत्वज्ञान, मोक्षप्राप्ती आणि अज्ञान अंध:काराच्या आहारी गेलेला समाज आणि बुडता हे जन न देखवे डोळा या प्रेरणेने निर्माण झाले. संतानी ऐहिक जीवनापेक्षा संसारातून वैराग्य, परमेश्वर प्राप्ती, शरणता ह्या भाववृत्तीतून उपदेशपर काव्य लिहिले.

पंडिती कवींनी आख्यानपर रचना केल्या. त्यांनी पंचमहाकाव्यातील अनेक विषय घेऊन काव्यरचना केल्या आहेत. वृत्त-छंद-अलंकारांनी सजलेली, शब्दपांडीत्यात रमलेली कविता म्हणजे पंडिती काव्य होय. महाभारत, रामायण, भागवत इत्यादी ग्रंथांच्या आधाराने ओवी, अभंग, श्लोक इत्यादी माध्यमातून पंडिती कवींनी रामाची, कृष्णाची, हरिश्चंद्राची, कौरव-पांडवांची, द्रौपदीची, सीतेची, नल-दमयंतीची, आख्याने रचली. तत्वनिरूपण किंवा आख्यानकाव्य या प्रत्येक प्रवाहाचा उगम पूर्वकालीन संस्कृत साहित्याशी संबंधित आहे. गीता, भागवत, रामायण, महाभारत यांसारख्या ग्रंथांवर या सर्व प्राचीन मराठी कवींचा प्रभाव आहे. त्यामुळे प्राचीन मराठी कवींचे विषय अलौकिक, देवादिकांचे, पारमार्थिक, अध्यात्मिक आहेत.

शाहिरांचे काव्य हे बऱ्याचदा मौखिक स्वरूपाचे होते. समाजातील विविध व्यवसायातील शाहीर असल्यामुळे त्यांची भाषाही काहीशी रांगडी, मनमोकळी आणि खास मराठी वळणाची होती. संतसाहित्यापेक्षा आणि पंडिती वाड्मयापेक्षा स्वतंत्र आणि वेगळ्या धाटणीचे साहित्य म्हणजे शाहिरी वाड्मय होय. संतानी आपल्या वाड्मयातून आध्यात्मिक दृष्टी दिली तर पंडित कवींनी रामायण, महाभारत, भागवत व अन्य पुराणग्रंथातून कथांचे संक्षिप्त रूप वाचकांसमोर ठेवले. तर शाहिरी वाड्मयामध्ये लोकजीवनातील विविध प्रसंग, जीवावर उदार होऊन पराक्रम करणारे वीर पुरुष आणि आपल्या रूपगुणसौंदर्यांने मोह घालणाऱ्या रूपयौवना यांचे चित्रण केले आहे. लोकांच्या भावनांचा अविष्कार लोकांच्याच शब्दांत मांडणारे शाहिर हे खऱ्या अर्थाने लोककवी होते. त्यांच्या वाड्मयामध्ये रगेलपणा आणि रंगलेपणा आलेला आहे. त्यांनी आपल्या वाड्मयामध्ये समकालीन जीवनाचे चित्रण केले आहे. म. ना. अदवंत म्हणतात 'संतकाव्य महाराष्ट्राच्या आध्यात्मिक जीवनाचे प्रतिबिंब असले तरी शाहिरी काव्य महाराष्ट्राच्या राजकीय व सामाजिक जीवनाचे प्रतिबिंब आहे.' शाहिर व शाहिरी म्हणजे कवी आणि कविता असा अर्थ असला तरी शाहिर म्हटला

म्हणजे लावण्या आणि पोवाडे रचणारा कवी, असा अर्थ सर्वसामान्यपणे मनात ठसतो.

पोवाडा आणि लावण्या ही शाहिरी कवितेची दोन अंगे आहेत. पोवाडा म्हणजे वीरांच्या पराक्रमाचे, गुण-कौशल्याचे काव्यात्मक वर्णन किंवा स्तुती होय. महाराष्ट्रात कुलधर्माच्या वेळी गोंधळ घालण्याचा प्रकार आहे. या गोंधळातून पोवाडा हा प्रकार पुढे आला. लावणी हे शाहिरी कवितेचे दुसरे अंग आहे. पोवाडा रांगडा, ओबड-धोबड असतो. तर लावणी नाजूक आणि अटकर बांध्याची असते. लावणीतील शृंगाराच्या वर्णनामुळे पांढरपेशा आणि सुशिक्षितांच्या जीवनापासून ती लांब राहिली आहे. सजण आणि सजणी यांची मनाला धुंद करणारी चित्रे दिसतात. वीरश्री आणि शृंगार हे दोन्ही विषय तारुण्याला भुरळ पाडणारे असल्यामुळे एकातून रंगेलपणाचे तर दुसऱ्यातून वीररसाचे दर्शन घडते. वीरसाशिवाय पोवाड्याला आणि शृंगाराशिवाय लावणीला मजा येत नाही. अशा या लावणीचा जन्म पूर्वपेशवाईत झाला. लावणीच्या जन्माचा आणि विकासाचा हा कालखंड मराठी साम्राज्याच्या ऐश्वर्याचा आणि अधिकारांच्या उपभोगाचा होता.

लावणीच्या व्युत्पतीविषयी अनेक मते मांडलेली आहेत. शेतात लावणी करताना म्हटले जाते ते लावणी गीत. 'लवण' म्हणजे सुंदर त्यावरून 'लावण्य' या भाववाचक नामाप्रमाणे स्त्रीसौंदर्यवर्णनपर काव्य म्हणजे लावणी होय. किंवा 'जी हृदयाला चटका लावते ती लावणी' अशी लावणीची व्याख्या अ. ब. कोल्हटकरांनी केली आहे. तर "सर्वसामान्य जनांच्या मनोरंजनाकरिता त्यांना रूचतील अशा लौकिक, पौराणिक किंवा आध्यात्मिक विषयावर रचलेली कडे वा ढोलके यांच्या तालावर विशिष्ट ढंगाने म्हटलेली खटकेबाज व सफाईदार पद्यावर्तनी वा भृंगावर्तनी जातिरचना म्हणजे लावणी होय." अशी म. वा. धोंड यांनी व्याख्या केली आहे. पोवाड्यांची रचना राजकीय जीवनातून उदयाला आली, तर लावणीची निर्मिती सामाजिक जीवनातून झाली. लावणीचा उद्देशच मनोरंजन असल्यामुळे त्या जनसमूहासमोर म्हटल्या जातात. ल. रा. नसीराबादकर म्हणतात "त्या काळामध्ये मुलूखगिरीत गुंतलेल्या, संसारात शिणलेल्या आणि विलासात आंबलेल्या मनाला परत ताजेतवाने करून जीवनात रंग भरण्याकरिता शाहिरांनी आपल्या लावण्याची रचना केली."[१] लोकजीवनातील विविधता लावणीत दिसते. त्याचबरोबर पौराणिक आणि उपदेशपर लावण्यांतून गणपती, शंकर यासारख्या काही देवतांची, तीर्थक्षेत्रांची वर्णने केली आहेत. मराठी पोशाख, चालीरीती, भाषासंकेत, स्वभाव इत्यादी सारी वैशिष्ट्ये या लावण्यात दिसतात. उदा. पतिविरहाने झुरणारी किंवा नवऱ्याने सवत आणली म्हणून नाराज होऊन 'तो लंपट तिजवर, मी म्हणून खुश तुजवर' असे परपुरुषाबरोबर वाममार्गाने जाणाऱ्या नायिकेचे चित्रन येते. तसेच मोहिमेवर आपणालाही सोबत न्यावे म्हणून हट्ट करणारी किंवा नवऱ्याला लढाईसाठी पाठविणारी कर्तव्यदक्ष नायिकाही दिसते. त्याचबरोबर निपुत्रिका, दोन बायकांनी नवऱ्याची केलेली फजिताही लावण्यात दिसते.

होनाजीबाळा, रामजोशी, परशराम, प्रभाकर, सगनभाऊ इ. शाहिरांनी लावणी लिहिली आहे. परशरामाच्या लावणीत विषयवैचित्र्य आहे. त्यांनी पौराणिक वेदांतपर आणि मानवी जीवनातील अनेक विषयावर लावणी लेखन केले आहे. उदा. 'नयन सुरेख दोन्ही लाल अंगावर शाल दुपेटा जरी, उमदा कोणी उमराव दिसे, सरदार सौभाग्य घरी' हे मर्दानी स्त्रीच्या सौंदर्याचे वर्णन परशरामांनी केले आहे. तसेच त्यांनी रोजच्या सामाजिक जीवनातील विसंगतीचे दर्शन आपल्या लावण्यातुन साकारले आहे. त्यांच्या लावण्या उपरोधिक शैली आणि विनोदी दृष्टीमुळे दीर्घकाळ स्मरणात राहतात. त्यांच्या लावण्यामध्ये सामान्य जनतेची राहणी, नवससायासांचे प्रकार, लोकसमजुती यांचेही चित्रण आले आहे. तसेच पेशवेकालीन ऐश्वर्याचे वर्णन, पतिव्रतेचे अनुकरण करणारी बाष्कळ स्त्री, सवतींचे भांडण, लढाईतून पळून आलेला

शेंदाड शिपाई, नवऱ्याला वेगळे राहण्याचा आग्रह धरणारी दुधड नार, ऐतखाऊ नादान नवरा इ. अनेक तऱ्हेची चित्रे परशरामाच्या लावण्यांत दिसतात. त्याचबरोबर त्यांच्या लावण्यांत प्रभावी शब्दरचना आहे. उदा. 'निर्मळ मुखडा चंद्राकार | सरळ नाकाची शोभते धार' किंवा 'गगनात चांदणी ठळक मरिशी झळक उभी अंगणी | किती नटून थटून मारशिल घनाघन नयनाच्या संगिनी' इ. तसेच 'गोरे गाल जसा नरम खवा,' 'कुसुंबी गाल जशी बनात' अशा ग्रामीण उपमा आढळतात.

रामजोशी यांच्या लावण्यांत स्त्रीच्या यौवनाची प्रियकरासाठी होणाऱ्या तळमळीची वर्णने आली आहेत. उदा. 'सुंदरा मनामध्ये भरली ही रामजोशी यांची गाजलेली लावणी म्हणजे स्त्रीसौंदर्याच्या मोहक आणि उन्मादक वर्णनाचा सुंदर अविष्कार होय .त्यांनी मराठमोळ्या स्त्रीचे सौंदर्य आणि तिचा साजशृंगार यांचे वर्णन मोठ्या ढंगदारपणे केले आहे. त्यांनी स्त्रीमनाचे अनेक पदर आपल्या लावण्यातून रेखाटले आहेत. उदा. विरहव्याप्त नायिका, पतीची विनवनी करणारी पतिव्रता इ. लौकिक विषयाबरोबर पौराणिक विषयावरही लावण्या लिहिलेल्या आहेत. त्यांच्या उपदेशपर लावण्याही मनाची पकड घेतात.

प्रभाकरांचा लावण्यांत शृंगाराच्या वेगवेगळ्या छटा दिसतात. त्यांनी दुसऱ्या बाजीरावाच्या जीवनावर अनेक लावण्या रचल्या आहेत. त्यांच्या लावण्यात शृंगाराच्या भडक वर्णनाबरोबर खानदानी स्त्रीच्या सौंदर्याचे वर्णनही उल्लेखनीय आहे. उदा. 'मोहिनी जशी सुरसभेमध्ये अमृत वाढी करी | तशी नार पंगतीत आग्रह करी' इ. तसेच विरहाने व्याकूळ झालेली, पतीला घरी राहण्याचा आग्रह करणारी पत्नी, तर दुसरी कूचाची नौबत झाली म्हणून पतीला उठवून स्वारीवर पाठविणारी पत्नी. पतीसोबत स्वारीवर येण्याचा हट्ट धरणारी पत्नी, इ. विविध वर्णनानी लावण्या आलेल्या आहेत. त्याचबरोबर त्यांनी तत्कालीन सामाजिक जीवनाचे चित्रण केले आहे. तत्कालीन मराठी स्त्रीच्या अंगावरील अलंकाराचे वर्णनही केले आहे. त्यांच्या काही पौराणिक लावण्यातून देव-देवतांच्या ठिकाणी सामान्य स्त्रीच्या भावनांच्या रेखाटनाचे चित्रण केले आहे. सूक्ष्म अवलोकन भावनांचा उत्कट आविष्कार आणि प्रासादिक भाषा इ. मुळे त्यांच्या लावण्या लोकप्रिय झाल्या.'

सगनभाऊंच्या लावण्यांत शृंगाराच्या बाह्यवर्णनापेक्षा अंतर्मनाला अधिक प्राधान्य आहे. त्यांच्या लावणीतून व्यावहारीक नितिविषयक उपदेश आलेला आहे. सवाल-जबाब, सवती-सवतींचे भांडण इ. विषयावर लावण्या रचलेल्या आहेत. तसेच त्यांच्या लावण्यात रामायण-महाभारत ग्रंथातील दाखले, मायावाद आणि ब्रह्मज्ञानाचा उल्लेख आलेला आहे.

होनाजी बाळा यांचा जन्म पिढीजात कविता करणाऱ्या घरात झाला. शब्द होनाजीचे आणि स्वर बाळाचे असल्यामुळे त्याच्या लावण्यांना कमालीची लोकप्रियता मिळाली. होनाजी संगीत तज्ञ आणि कल्पक असल्यामुळे त्यांच्या लावण्यांत नवे नवे छंद धाटणी व शब्दांची ठेवण सरस होती. त्यांच्या लावण्यातून प्रेमभावनेच्या विविध छटा हाताळल्या आहेत. शृगाच्या उत्तान भावनेपासून ते निपुत्रिकेच्या करूण कहाणीपर्यंत वर्णन केले आहे. पतीविरहाने झुरणारी नववधू, एकनिष्ठ पत्नी इ. चित्रण आले आहे. उदा. 'गेला जसा तसा कधी पाहीन आपला प्राणविसावा | सत्वर उठा सख्यांनो मजला पक्ष्यांचे पर लावा' असे उदगार काढणारी स्त्री दिसते. होनाजीची अत्यंत गाजलेली लावणी म्हणजे 'लटपट लटपट तुझं चालणं मोठ्या नखऱ्याचं | बोलणं ग मंजुळ मैनेचं या लावणीमध्ये मराठमोळ्या स्त्री सौंदर्याचे वर्णन आले आहे. ल. रा. नासिराबादकर म्हणतात "होणाजीची लावणी म्हणजे एका सहृदय संगीत तज्ञाच्या उदात्त प्रेमविषयक कल्पनांचा सात्विक आणि कलात्मक आविष्कार आहे."[२]

लावणी ही सुरेख नाट्यगीत असल्यामुळे केवळ सुरावर आणि ठेक्यावर म्हणून भागत नाही, तर तिला

अभिनयाची जोड द्यावी लागते. लावणीत भाषेचा जोम, कलात्मकता आणि ढंगदारपणा असल्यामुळे रसिकांचे मन खेचून घेते. दर्द, बेबंद, छोलछबेली, नार अलबेली, इश्काची चटक चांदणी यासारख्या शब्द योजनेमुळे लावणी चटकदारपणा असला तरी अस्सल मराठी गावरान शब्दपेरणीही केली आहे. लावणीतील वर्णने, उपमा, प्रतिमा, सौंदर्यविषयक कल्पना, वेशभूषा, अलंकार, चालीरीती, म्हणी, वाक्प्रचार यातून शाहिरी कवितेचे शुद्ध मराठीपण प्रत्ययास येते.

**निष्कर्ष:**

१) संत साहित्यापेक्षा आणि पंडिती वाड्मयापेक्षा स्वतंत्र आणि वेगळ्या धाटणीचे साहित्य म्हणजे शाहिरी वाड्मय होय.

२) शाहिरी वाड्मयामध्ये लोक जीवनातील विविध प्रसंग जीवावर उदार होऊन पराक्रम करणारे वीर पुरुष आणि आपल्या रूप, गुण, सौंदर्याने मोह घालणाऱ्या रुपयौवना यांचे चित्रण केले आहे.

३) पोवाड्यांची रचना राजकीय जीवनातून उदयाला आली, तर लावण्यांची निर्मिती सामाजिक जीवनातून झाली.

४) वीररसाशिवाय पोवाड्याला आणि शृंगाराशिवाय लावणीला मजा येत नाही.

**संदर्भ ग्रंथ:**

१) ल. रा.नसिराबादकर - प्राचीन मराठी वाड्मयाचा इतिहास

२) ल. रा.नसिराबादकर - प्राचीन मराठी वाड्मयाचा इतिहास. पृ.२३८